PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
PUNE

Newspaper : Lok Satta

Date of Publication : 2/6/2018

Language : Marathi/Hindi/English

Place of Publication : Pune

# उड्डाणपुलाचे काम सुरू करण्याचे आदेश

## केंद्रीय भुपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची माहिती; चांदणी चौकातील वाहतूक कोंडी फुटणार

**प्रतिनिधी, पुणे**





**चांदणी चौकातील** उड्डाणपुलासाठी चौदा हेक्टर जागेपैकी साडेपाच हेक्टर जागा पुणे महापालिकेने संपादित केली आहे. उर्वरित साडेआठ हेक्टर संरक्षण विभागाची जागा ताब्यात घेण्याचे बाकी असून आयुक्त आणि महापालिकेने त्यात लक्ष घालून जागा संपादित करावी. ऐंशी टक्के भूसंपादन झाल्याशिवाय काम सुरू करायचे नाही, असा नियम माझ्या खात्यामध्ये केला आहे. मात्र, चांदणी चौकातील उड्डाणपुलाच्या कामाचे आदेश आजच ठेकेदाराला देण्यात येतील, अशी माहिती केंद्रीय भुपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी शुक्रवारी दिली.

नरेंद्र मोदी सरकारच्या चार वर्षांतील कार्यकाळात करण्यात आलेल्या विकासकामांची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत गडकरी बोलत होते. पालकमंत्री गिरीश बापट, महापौर मुक्ता टिळक, महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्यासह पक्षाचे आमदार, खासदार या वेळी उपस्थित होते. चांदणी चौकातील उड्डाणपुलाचे काम, पीएमआरडीएकडून करण्यात येणाऱ्या प्रस्तावित वर्तुळाकार रस्त्याबाबत त्यांनी माहिती दिली. ते म्हणाले, की चांदणी चौकाच्या उड्डाणपुलाची निविदा काढली असून कार्यारंभ आदेश दिला आहे. या कामासाठी चौदा हेक्टर जागा पुणे महापालिकेला संपादित करायची आहे. त्यापैकी आतापर्यंत साडेपाच हेक्टर जागा संपादित झाली असून उर्वरित साडेआठ हेक्टर जागा महापालिकेने संपादित करायची आहे. ऐंशी टक्के भूसंपादन झाल्याशिवाय काम सुरू करायचे नाही, असा नियम माझ्या खात्यामध्ये करण्यात आला आहे. मात्र, चांदणी चौकाच्या उड्डाणपुलासाठी नेमलेल्या ठेकेदाराला काम सुरू करण्याचे आदेश आजच देण्यात येतील. मात्र, उर्वरित जागेचे भूसंपादन तातडीने करण्याची महापालिकेला आणि आयुक्तांना विनंती आहे. उर्वरित भूसंपादन करायची जागा संरक्षण विभागाची असून या कामात एकूण एक उन्नत मार्ग, दोन उड्डाणपूल आणि एक भूमिगत मार्ग आहे. हे काम सुरू झाल्यानंतर वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करु, अशी ग्वाही गडकरी यांनी या वेळी बोलताना दिली.

### माझे खाते टप्प्याटप्प्याने काम करत नाही

पीएमआरडीएच्या वर्तुळाकार रस्त्याबाबत गडकरी म्हणाले,की पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पुणे मेट्रोपोलिटन रिजन डेव्हलपमेंट ॲथॉरिटी - पीएमआरडीए) तेवीस हजार कोटी रुपयांचा वर्तुळाकार रस्ता प्रस्तावित आहे. रस्ता उभारणीसाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून (एनएचएआय) दहा हजार कोटी रुपये देऊ. तसेच या रस्त्याचे काम मार्गी लावण्यासाठी एनएचएआयऐवजी पीएमआरडीएला स्वतंत्र कंपनी म्हणून मान्यता दिली आहे. भूसंपादनासाठी राज्य शासनाने जमीन उपलब्ध करुन दिल्यास तातडीने काम सुरु करु. माझे खाते टप्प्याटप्प्याने काम करत नाही. भूसंपादन होण्याच्या आधी कामे सुरु केल्यास न्यायालयात, हरित लवादात जाऊन स्थगिती आणण्यात येते, त्यानंतर अनेक वर्षे प्रकल्प रखडतात. त्यामुळे आधी भूसंपादन करुन मग कामे करावीत. मात्र, टप्प्याटप्प्याने काम करण्याची पालकमंत्री बापट यांची इच्छा असल्यास माझी हरकत नाही. जमीन उपलब्ध करुन दिल्यास दीड वर्षात रिंगरोड पूर्ण करु.

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
PUNE

Newspaper : Samana

Date of Publication : 2/6/2018

Language : Marathi/Hindi/English

Place of Publication : Pune

# पुणे-सातारा महामार्गाची कामे डिसेंबरपर्यंत पूर्ण होतील

पुणे, दि. १ (प्रतिनिधी) – पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गाचे केवळ १२ किलोमीटर रुंदीकरणाचे काम बाकी आहे. त्यामुळे या मार्गावरील रखडलेली कामे येत्या ५ डिसेंबरपर्यंत पूर्ण केली जातील, अशी माहिती केंद्रीय वाहतूक आणि दळणवळनमंत्री नितीन गडकरी यांनी दिली. दरम्यान, पालकमंत्री गिरीश बापट यांना रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी सर्वाधिकार देण्यात आले आहेत. ते याबाबत सातत्याने पाठपुरावा करीत असल्याचेही त्यांनी सांगितले.

पुण्यात आयोजिक पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी पुणे-सातारा रस्त्याच्या कामाविषयी माहिती दिली. गडकरी म्हणाले, पुणे-सातारा महामार्ग रुंदीकरणाच्या कामाची किंमत १७२५ कोटी रुपये असून, लांबी १४०.३५ कि.मी. एवढी आहे. त्यातील १२८.३० कि.मी.चे सहापदरीकरण करायचे असून, या कामामधील १२ कि.मी. सोडल्यास उर्वरित काम पूर्ण झालेले आहे. या १२ कि.मी.मधील रस्तेजोडणी आणि बांधणीचे (स्ट्रक्चर) काम बाकी आहे. त्यामध्ये एकूण ६२ स्ट्रक्चर असून,



त्यातील ४७ पूर्ण झाली आहेत, तर चालू दहा स्ट्रक्चर ऑक्टोबरपर्यंत पूर्ण होतील. येत्या ५ डिसेंबरपर्यंत रुंदीकरणाची कामे पूर्ण केली जातील.

दरम्यान, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चारमधील पुणे-सातारा रस्त्याच्या कामासाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (नॅशनल हायवेज अॅथॉरिटी ऑफ इंडिया - एनएचएआय) आणि रिलायन्समध्ये झालेला करार कॉंग्रेस सरकारच्या काळातील आहे. हे काम आम्ही रिलायन्सला दिलेले नाही. या कामात असंख्य अडचणी आल्या असून, दिल्लीमध्ये मी स्वतः अनेक बैठका घेतल्या आहेत. पुण्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी सौरभ राव, सातारा प्रशासन यांनी प्रयत्न करून जवळपास सर्व भूसंपादन पूर्ण केले आहे, असेही गडकरी यांनी सांगितले.

### चांदणी चौकातील उड्डाणपुलाच्या कामाचा आदेश आजच

▪ चांदणी चौकातील उड्डाणपुलासाठी चौदा हेक्टर जागेपैकी साडेपाच हेक्टर जागा पुणे महापालिकेने संपादित केली आहे. उर्वरित साडेआठ हेक्टर संरक्षण विभागाची जागा ताब्यात घेण्याचे बाकी असून, आयुक्त आणि पालिकेने यात लक्ष घालून जागा संपादित करावी. ८० टक्के भूसंपादन झाल्याशिवाय काम सुरू करायचे नाही, असा नियम माझ्या खात्यामध्ये केला आहे. मात्र, चांदणी चौकातील उड्डाणपुलाच्या कामाचा आदेश आजच ठेकेदाराला देण्यात येईल, अशी माहिती गडकरी यांनी दिली.

### माझे खाते टप्प्याटप्प्याने काम करीत नाही

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पुणे मेट्रोपोलिटन रिजन डेव्हलपमेंट ऑथॉरिटी - पीएमआरडीए) २३ हजार कोटी रुपयांचा वर्तुळाकार रस्ता (रिंगरोड) प्रस्तावित आहे. रस्ता उभारणीसाठी एनएचएआयला दहा हजार कोटी रुपये देऊ. तसेच या रस्त्याचे काम मार्गी लावण्यासाठी एनएचएआयऐवजी पीएमआरडीएला स्वतंत्र कंपनी म्हणून मान्यता दिली आहे. भूसंपादनासाठी राज्य शासनाने जमीन उपलब्ध करून दिल्यास तातडीने काम सुरू करू. टप्प्याटप्प्याने माझे खाते काम करीत नाही. भूसंपादन होण्याच्या आधी कामे सुरू केल्यास अनेक अडचणी येतात. त्यामुळे आधी भूसंपादन करून मग कामे करावीत. मात्र, टप्प्याटप्प्याने काम करण्याची पालकमंत्री बापट यांची इच्छा असल्यास माझी हरकत नाही. जमीन उपलब्ध करून दिल्यास दीड वर्षात रिंगरोड पूर्ण करू, असेही नितीन गडकरी यांनी स्पष्ट केले.

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
PUNE

Newspaper : Sakal

Date of Publication : 2/6/2018

Language : Marathi/Hindi/English

Place of Publication : Pune

# पुणे–सातारा रस्त्यासाठी डिसेंबरची डेडलाइन

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी : प्राधान्याने पूर्ततेसाठी पालकमंत्री बापट यांना अधिकार



नितीन गडकरी

पुणे, ता. १ : जागोजागी असलेल्या 'डायव्हर्जन'मुळे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चारचा भाग असलेला पुणे- सातारा रस्ता वाहनचालकांसाठी नेहमीच डोकेदुखी ठरत आला आहे. या रस्त्याचे काम गेल्या दहा वर्षांपासून सुरू असून, ते अद्यापही पूर्ण झालेले नाही. पण, आता हे काम पुढील सहा महिन्यांमध्ये पूर्ण होईल, अशी नवीन 'डेडलाइन' खुद्द केंद्रीय रस्ते व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे.

सरकारने गेल्या चार वर्षांमध्ये केलेल्या कामांची माहिती देण्यासाठी आज आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना गडकरी म्हणाले, "येत्या पाच डिसेंबरपर्यंत पुणे- सातारा महामार्गाच्या सहा पदरीकरणाचे काम पूर्ण होईल, त्यासाठी दिल्लीतदेखील बैठका घेतल्या आहेत. हे काम प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी पालकमंत्री बापट यांना अधिकार दिले आहेत."

या रस्त्याचे काम काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडी (यूपीए) सरकारने सुरू केले होते, त्यामुळे या कामाचे करार मोदी सरकारने केलेले नाहीत. त्यात अनेक गुंतागुंती होत्या. त्या सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. जमीन संपादनाचे काम आतापर्यंत सुरू होते, त्याला लोकांचा विरोध होता. आता हे सगळे प्रश्न सुटले आहेत. त्यामुळे येत्या ५ डिसेंबरपर्यंत हे काम पूर्ण होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

### चांदणी चौकातील कामाला गती

**अपघातात एका मुलीचे प्राण गेल्यानंतर अखेर चांदणी चौकातील वाहतूक सुरळीत करण्याच्या कामाला गती मिळत आहे. या प्रकल्पाबाबत माहिती देताना गडकरी म्हणाले, "चांदणी चौकातील प्रकल्पाच्या निविदा निघाल्या आहेत. एकूण १४ हेक्टर जागा पालिकेला संपादित करायची होती. त्यापैकी ५.५ हेक्टर जागा संपादित केली आहे. उर्वरित ८.५ हेक्टर जागा महापालिकेने संपादित करून द्यायची आहे."**

### रस्त्याबाबतचा तपशील

- **पुणे- सातारा रस्त्याची एकूण लांबी : १४०.३५ किमी**
- **काम पूर्ण झालेल्या रस्त्याची लांबी : १२८.३० किमी**
- **काम अपूर्ण असलेल्या रस्त्याची लांबी : १२ किमी**
- **एकूण ६२ पैकी पूर्ण झालेले स्ट्रक्चर : ४७**
- **एकूण खर्च : १७२५ कोटी रुपये**

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
PUNE

Newspaper : Maharashtra Times

Date of Publication : 2/6/2018

Language : Marathi/Hindi/English

Place of Publication : Pune

# पुणे-नगर रस्ता आठ पदरी

## नितीन गडकरींची माहिती; सातारा महामार्गाचे काम सहा महिन्यांत करणार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित केलेला पुणे-नगर-औरंगाबाद हा रस्ता आठ पदरी करण्यात येणार असून, या रस्त्याचा सविस्तर प्रकल्प आराखडा (डीपीआर) तयार करण्याची सूचना केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी शुक्रवारी केली; तसेच पुणे-सातारा महामार्गाचे रखडलेले काम येत्या पाच डिसेंबरपर्यंत पूर्ण होणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'भारतमाला' प्रकल्पाची घोषणा केली आहे. यामध्ये पूर्वेपासून पश्चिमेपर्यंतची शहरे जोडण्याचा संकल्प आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाने महाराष्ट्र, राजस्थान आणि गुजरात येथील आठ रस्त्यांचा समावेश केला होता. त्यामध्ये महाराष्ट्रातील पुणे-नगर, नगर-औरंगाबाद, औरंगाबाद-पैठण या रस्त्यांसह नगर, शेंद्रा, बिडकीन या दरम्यान दोन नवीन रस्त्यांचा समावेश आहे. पुणे-नगर-औरंगाबाद या रस्त्याची घोषणा मार्च २०१६ मध्ये करण्यात आली होती. त्यावेळी हा रस्ता सहा पदरी करण्याचे ठरले होते. मात्र, आता हा रस्ता आठ पदरी केला जाणार असल्याचे गडकरी यांनी स्पष्ट केले. मोदी सरकारच्या चार वर्षपूर्तीचा लेखाजोखा मांडण्यासाठी घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पालकमंत्री गिरीश बापट या वेळी उपस्थित होते.

ते म्हणाले, 'या प्रकल्पाअंतर्गत पुणे-नगर हा ११६ किलोमीटरचा रस्ता, औरंगाबाद-नेवासा-नगर हा ११० किमीचा रस्ता, औरंगाबाद-पैठण हा ५३ किमीचा रस्ता, शेंद्रा-बिडकीन हा २० किमी आणि नगर-बिडकीन हा ५० किमीचा रस्ता प्रस्तावित आहे. पुणे-नगर रोडवर रांजणगाव, सुपा व नगर येथे औद्योगिक वसाहती आहेत. औरंगाबाद परिसरात पंचतारांकित शेंद्रा औद्योगिक वसाहत आहे. पैठण शहर पैठणी साड्या व पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. तिन्ही शहरांना वाहतूक व दळणवळणाच्या दृष्टीने हा नवीन आठ पदरी रस्ता उपयुक्त ठरू शकतो. तसेच, त्यामुळे उद्योगांची संख्यादेखील वाढू शकते. या रस्त्याच्या कामामध्ये पादचारी, वाहनांसाठीचे भुयारी मार्ग किंवा उड्डाणपूल अशी एकूण ६२ 'स्ट्रक्चर'चा समावेश आहे. त्यापैकी ४७ 'स्ट्रक्चर'चे काम पूर्ण झाले असून, दहा ठिकाणचे काम सुरू आहे. ही सर्व कामे येत्या पाच डिसेंबरपर्यंत पूर्ण होतील. या रस्त्याबाबत गिरीश बापट यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून, त्यांचे विशेष लक्ष असणार आहे, असे गडकरी यांनी सांगितले.

### 'डीपीआर'ची घोषणा दोन वर्षांपूर्वीची

पुणे-नगर-औरंगाबाद रस्त्याचा 'डीपीआर' तयार करण्याबाबतचे आदेश केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने राष्ट्रीय महारार्ग प्राधिकरणाला (एनएचएआय) मार्च २०१६ मध्ये दिले होते. 'डीपीआर' करताना 'औद्योगिक धोरण आणि प्रोत्साहन' विभागाचा सल्ला घेण्याची सूचना त्यावेळी करण्यात आली होती. मात्र, तेव्हापासून आजतागायत 'डीपीआर' करण्याच्या आदेशावर कार्यवाही करण्यात आली नाही का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### विकासासाठी नवा महामार्ग

भारतमाला योजनेत पुणे-नगर-औरंगाबाद रस्त्याचा समावेश



महाराष्ट्र टाइम्स
पुणे
सुपरफास्ट



> पुणे-नगर-औरंगाबाद रस्त्याच्या कामामध्ये भू-संपादनापासून राजकीय विरोधापर्यंत अनेक अडथळे आल्याने या रस्त्याचे काम रखडले होते; परंतु आता संपूर्ण भू-संपादन झाले आहे.
>
> – नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री

### वाघोली ते शिरूर क्षमतेपेक्षा दुप्पट वाहतूक

पुणे-नगर रस्त्यावर वाघोली ते शिरूर या दरम्यान क्षमतेपेक्षा दुप्पट वाहनांची वाहतूक होत असल्याचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. साधारणपणे ४० हजार 'पीसीयू'चा (पॅसेंजर कार युनिट) टप्पा गाठल्यानंतर चौपदरी रस्त्याची आवश्यकता असते. वाघोली ते शिरूर या दरम्यान दररोज होणाऱ्या वाहतुकीचा 'पीसीयू' एक लाखाच्या जवळपास आहे. त्यामुळे या ठिकाणी तातडीने रस्ता रुंदीकरण गरजेचे आहे, असे त्या अधिकाऱ्याने स्पष्ट केले.

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
PUNE

Newspaper : Sakal

Date of Publication : 2/6/2018

Language : Marathi/Hindi/English

Place of Publication : Pune

# पर्यायी इंधनाला प्रोत्साहन

## इंधन खर्चात सहा महिन्यांत बचत होण्याचे नितीन गडकरींचे आश्वासन

पुणे, ता. १ : तुमच्या महिन्याच्या खर्चात पुढील सहा महिन्यांमध्ये चार हजार रुपयांची निश्चित बचत होईल, असा विश्वास केंद्रीय रस्ते व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी शुक्रवारी पुण्यात व्यक्त केला. केंद्र सरकारतर्फे इथेनॉल, मिथेनॉल, जैव इंधन, सीएनजी अशा पर्यायी इंधनांच्या वापरास प्रोत्साहन देत असून, त्याला वाहन उद्योगातूनही सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे सामान्यांचा इंधनावरील खर्च कमी होईल, असे ते म्हणाले.

देशात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वेगाने वाढत आहेत. त्याबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना गडकरी म्हणाले, ''पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमती नियंत्रित करण्यासाठी उपाययोजनांवर केंद्र सरकार विचार करीत आहे. पेट्रोल आणि डिझेलवर राज्याने 'जीएसटी' लागू केल्यास प्रतिलिटरमागे सात ते आठ रुपयांनी याचे दर कमी होतील. त्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्णय घेतला पाहिजे. सरकार इथेनॉलचे १३ कारखाने सुरू करत आहे.''

### अशी होईल बचत

इथेनॉल आणि इलेक्ट्रिकवर चालणाऱ्या वाहनांना प्रोत्साहन देण्याची सरकारची धोरण आहे. त्याला वाहन उद्योगांकडूनही प्रतिसाद मिळाला आहे. पेट्रोलच्या गाडीवर ४८ टक्के 'जीएसटी' आहे, तर इलेक्ट्रिक आणि जैव इंधनावर चालणाऱ्या गाडीवर १२ टक्के 'जीएसटी' आहे. जैव इंधनावर दरमहा ३५०० रुपये, तर इलेक्ट्रॉनिकवर हजार रुपये बचत होईल, असेही गडकरी यांनी स्पष्ट केले.

### ईव्हीएमबाबत सोयीने आक्षेप

इलेक्टॉनिक व्होटिंग मशिनबाबत सोयीनुसार आक्षेप घेतले जात आहेत. गेल्यावेळी भंडारा-गोंदिया मतदारसंघातून पराभूत झाल्यानंतर प्रफुल्ल पटेल यांनी 'ईव्हीएम'वर आक्षेप घेतला. आता राष्ट्रवादीचा उमेदवार विजयी झाल्यानंतर त्यांचा 'ईव्हीएम' मशिनबाबत आक्षेप नाही का, असा प्रश्न गडकरी यांनी उपस्थित केला. ते म्हणाले, ''ईव्हीएमबाबत सर्व पक्ष सोयीची भूमिका घेत आहेत. निकाल विरोधात गेल्यानंतर 'ईव्हीएम'ला दोष देण्याची परंपरा निर्माण झाली आहे.



सेनापती बापट रस्ता : राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यामध्ये शुक्रवारी चर्चा झाली.

### गडकरी-पवार यांची विकासकामांबाबत चर्चा

**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार व केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांची शुक्रवारी पुण्यात भेट झाली. या भेटीत नागपूरच्या धर्तीवर राज्यात ब्रॉडगेज मेट्रो करता येईल का, तसेच पुणे-पंढरपूर पालखी मार्गाच्या रखडलेल्या कामाबाबत चर्चा झाल्याचे सांगण्यात आले. पुरंदरला होणाऱ्या नव्या विमानतळाला सासवडसह जवळची रेल्वे स्टेशन थेट रस्त्याने जोडण्यात यावीत, असे पवार यांनी गडकरी यांना सुचविल्याचे समजते. सूत्रांच्या माहितीनुसार ही गुप्त भेट नव्हती. दहा मिनिटे झालेल्या या भेटीत पुण्याच्या विकासकामांबाबत चर्चा झाली.**

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
PUNE

Newspaper : Kesari

Date of Publication : 2/6/2018

Language : Marathi/Hindi/English

Place of Publication : Pune

# पेट्रोल, डिझेल जीएसटीच्या कक्षेत येणार!



**पुणे :** राज्य सरकारांनी पेट्रोल, डिझेल जीएसटीमध्ये आणण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे दरवाढीतून लवकरच मार्ग काढण्याचा प्रयत्न सुरु आहे. पेट्रोलियम पदार्थांची आयात कमी करण्यासाठी तुलनेने परवडणाऱ्या इथेनॉल, वीजेवर धावणाऱ्या आणि सार्वजनिक वाहतुकीसाठी उपयुक्त ठरणाऱ्या वाहनांचा वापर वाढविण्यासाठीही सरकार विचार करत असल्याची माहिती केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

केंद्रातील भारतीय जनता पक्षाच्या सरकारला चार वर्षे पुर्ण झाल्याच्या निमित्ताने केंद्रसरकारने केलेल्या कामांची माहिती देण्यासाठी शुक्रवारी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गडकरी बोलत होते. याप्रसंगी पुण्याचे पालकमंत्री गिरीष बापट उपस्थित होते.

नितीन गडकरी म्हणाले, की अमेरिकेने इराणवर लादलेल्या निर्बंधानंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर पेट्रोलियम पदार्थांचे दर वाढले आहेत. पेट्रोल आणि डिझेल दरवाढीमुळे ग्राहक त्रासले आहेत, याची माहिती आहे. परंतू कांदा, बटाटा, खाद्यतेल, साखरेसारख्या जीवनावश्यक पदार्थांचे दर कमी झाले आहेत. इंधन दरवाढीवर मात करण्यासाठी पेट्रोलियम पदार्थांची आयात कमी कशी होईल, याचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचवेळी दुसरीकडे आपल्याकडे मोठ्याप्रमाणावर तयार केल्या जाणाऱ्या इथेनॉलचा वापर सार्वजनिक वाहतूकीसाठी वापरल्या जाणाऱ्या बसेस आणि अन्य वाहनांमध्ये कसा वाढवता येईल, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दिल्ली आणि नागपूरमध्ये इथेनॉलवर धावणाऱ्या तसेच वीजेवर धावणाऱ्या बसेस आणि अन्य वाहनांची संख्या वाढविण्यात आल्याने तेथील वाढत्या प्रदुषणालाही आळा बसल्याचे समोर येत आहे. आपल्याकडे उस उत्पादन मोठ्याप्रमाणावर होते. त्यातील बगॅसपासून इथेनॉलची निर्मिती होते. पुढील टप्प्यात बांबू, ज्वारी व अन्य शेती उत्पादनापासून इथेनॉलचे उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न राहातील.

इथेनॉल आणि वीजेवर चालणाऱ्या स्वंयचलित वाहनांचे उत्पादन करण्यासाठी उत्पादक कंपन्या पुढे येत आहेत.

## टोलचे समर्थन

▪ देशामध्ये चांगले रस्ते हवे असतील तर टोल भरावाच लागेल, भाजपने चार वर्षांपूर्वी टोलमुक्त महाराष्ट्र करू असे आश्वासन दिले असताना गडकरी यांनी टोलचे समर्थन केले आहे. चांगल्या सेवा हव्या असतील तर पैसे द्यावेच लागतील, आपण टोल मुक्ती करू असे कधीच म्हणालो नाही. आज देशामध्ये प्रत्येक दिवसाला २७ किलोमीटरचे रस्ते तयार होत आहेत. आशियातील सर्वात मोठा उड्डाणपूल आपण बांधला आहे. वरळी सि-लिंक आता दिल्ली-मेरठ महामार्ग, त्याचबरोबर देशात अनेक महत्त्वाचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. आज वेळ वाचत आहे. त्यामुळे टोल भरावाच लागेल, असे गडकरी यांनी स्पष्ट केले.

## सहा महिन्यांत इथेनॉल, विजेवर चालणाऱ्या गाड्या

▪ देशामध्ये चारचाकी आणि दुचाकी तयार करणाऱ्या कंपन्यांबरोबर बैठका झाल्या आहेत. इथेनॉल आणि विजेवर चालणाऱ्या गाड्या येत्या सहा महिन्यांमध्ये बाजारात येणार आहेत. देशात १३ ठिकाणी इथेनॉलचे कारखाने उभारण्यात येणार असून ५ कारखाने महाराष्ट्रामध्ये असतील. यामुळे प्रदूषण होणार नाही. त्याचबरोबर तेलाची आयात कमी होईल असे गडकरी यांनी सांगितले.

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
PUNE

Newspaper : Sakal Times

Date of Publication : 2/6/2018

Language : Marathi/Hindi/English

Place of Publication : Pune

# Start Chandni Chowk flyover work: Gadkari directs NHAI


**ST CORRESPONDENT**
reporters@sakaaltimes.com


**Pune:** Union Surface Transport Minister Nitin Gadkari on Friday ordered the National Highway Authority of India (NHAI) to start Chandni Chowk flyover work at a press conference in city.

Explaining the delay to start the work of the flyover, he said, "The NHAI has undertaken the Chandni Chowk flyover work. Around 15 hectares of land is needed for the project. The Pune Municipal Corporation (PMC) is acquiring the land. Till date, the civic body has acquired around six hectares of land. I don't allow the work of any project to start till 80 per cent of land is acquired. Now, I am ordering the officials concerned to start the work of Chandni Chowk flyover. I hope the PMC will acquire the remaining land as early as possible. The work will be completed within deadline. It is a four-lane road with three underpasses, bridges and service roads."

On August 27, 2017, Gadkari inaugurated the work for the Chandni Chowk flyover. However, the work has not started yet due to lack of acquisition of land. It is a Rs 400 crore project. The civic administration has conducted a survey of properties in Kothrud and Bavdhan, which will be demolished to construct the service roads and bridges. Along with residential complexes, bungalows and commercial places will have to be demolished. Till date, PMC has given Rs 88 crore compensation to project-affected flat owners.

Pic: Anand Chaini



Nitin Gadkari speaking at a press conference in city.

## PAWAR DEMANDS RAIL CONNECTIVITY TO PURANDAR AIRPORT

➤ During Gadkari's visit, NCP Chief Sharad Pawar met him and discussed the Purandar airport and other development projects such as palkhi route and the Pune-Solapur Highway. Pawar demanded rail connectivity to the proposed Purandar airport.

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
PUNE

Newspaper : Times of India
Date of Publication : 2/6/2018

Language : Marathi/Hindi/English
Place of Publication : Pune

# Gadkari vows Chandni Chowk flyover construction on time

## Tells PMC To Promptly Acquire Land

TIMES NEWS NETWORK

**Pune:** Union transport minister Nitin Gadkari on Friday assured that Chandni Chowk flyover would be completed within the stipulated time and said the work order for the project has been issued.

The minister said PMC has acquired 5.5 hectare of the required 14 hectare land so far. "PMC has to speed up the land acquisition process to ensure that the flyover is completed on time," he said.

On the execution of the ring road, Gadkari said he was not in favour of completing the project in a phased manner and insisted on at least 80% land acquisition to start the actual work. "Execution in parts leads to delays. Therefore, I am not in favour of it. But if (district guardian minister) Girish Bapat insists, it can be considered," Gadkari said.

He said the ring road will cost Rs 23,000 crore, of which he would assure funding of Rs 10,000 crore. "The ongoing work of six-laning of Pune-Satara highway will get over by December. The work on about 128km stretch is already over," he said, adding that the work of preparing a detailed project report of eight-laning of Pune-Aurangabad road was under way.

### FROM THE HORSE'S MOUTH

- Delhi-Meerut expressway brought down air pollution in the national capital
- Over Rs 40,000 crore works proposed in Delhi to improve transport infrastructure



- Ready to provide Rs 15 lakh subsidy/km for plantation drive along highways
- No plans to abolish toll
- Users will have to pay if they want good road infrastructure and transport facilities
- Not in favour of completing the ring road project in a phased manner because it leads to delays. However, if Pune guardian minister Bapat insists, this model can be considered
- There are attempts to create division in the society on the basis of caste

### BJP NEVER MADE CHANGES IN CONSTITUTION

Targeting opposition parties for false propaganda, Union minister Nitin Gadkari said BJP has not introduced a single change in the Constitution, while the Congress made 72 amendments during its tenure. "Elections are there and someone is going to win and lose. I personally feel that there is no need to politicise the development works," he said, adding that attempts were being made to create fear among Dalits, Muslims and tribal people.

# Govt working on policy to check fuel prices: Minister

TIMES NEWS NETWORK

**Pune:** Union minister of road transport and highways Nitin Gadkari on Friday said the government was working on a long-term policy to reign in the rising fuel prices.

Addressing a news conference here, Gadkari said fuel prices can go down by Rs 7-8 if brought under goods and services tax (GST). "However, a decision regarding this has to be taken by the respective state governments as they had earlier preferred to keep fuel out of the GST ambit," the minister added.

He said there was a need to make use of alternative fuels like ethanol as they are much cheaper than petrol and diesel. "Vehicle manufacturing firms have already initiated steps for the introduction of alternative fuel. Vehicles running on such fuel are likely to be introduced within the next six months," Gadkari said.

The minister said the state government should formulate an ethanol policy to increase its use as fuel in vehicles. He said a steep rise in construction of toilets, provision of electricity in every village, direct benefit transfer, curb on black money transactions were some of the milestones of the Centre in the last four years. "The Centre has allotted over Rs 40,000 crore for pending irrigation projects in Maharashtra. Irrigation potential is expected to increase from the existing 18% to 40%," he added.

Meanwhile, Gadkari had a closed-door meeting with NCP chief Sharad Pawar on Friday. While there was no official briefing from on the meet, photographs of both the leaders were uploaded on the Twitter handle of Gadkari, saying that the meeting involved discussion on the Nagpur's Metro project.

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
PUNE

Newspaper : Aaj Ka Aanand

Language : Marathi/Hindi/English

Date of Publication : 2/6/2018

Place of Publication : Pune

# पेट्रोल को GST के दायरे में लाने...

## चांदनी चौक के कार्य का टेंडर जारी

*नितिन गड़करी ने बताया कि चांदनी चौक के कार्य का टेंडर जारी किया गया है. चांदनी चौक की ट्रैफिक समस्या हल करने हेतु बनाये जाने वाले फ्लाइओवर हेतु 14 हेक्टेयर जमीन का अधिग्रहण जरूरी है. इसमें से साढ़े 5 हेक्टेयर जगह अधिग्रहित की गई है और बाकी जमीन के लिए मनपा द्वारा प्रयास किये जा रहे हैं. जमीन अधिग्रहित होते ही तेजी से काम शुरू किया जायेगा.*

(पेज 1 से आगे)

दिल्ली व नागपुर में इथेनॉल व बिजली पर दौड़ने वाली गाड़ियों की संख्या बढ़ाये जाने से वहां बढ़ते प्रदूषण पर नियंत्रण पाये जाने की बात सामने आ रही है. अपने यहां बड़े पैमाने पर गन्ने का उत्पादन होता है और उसके शीरे से इथेनॉल बनता है. अगले चरण में बांस, ज्वार व अन्य कृषि उत्पादों का इस्तेमाल कर इथेनॉल का उत्पादन बढ़ाने की कोशिशें की जाएंगी.

**महाराष्ट्र में लिथियम बैटरियों का उत्पादन करने वाली 5 कंपनियां खुलेंगी**

नितिन गड़करी ने कहा कि इथेनॉल व बिजली पर चलने वाली स्वचलित गाड़ियों का प्रोडक्शन करने हेतु उत्पादक कंपनियां आगे आ रही हैं. उन्होंने कुछ मॉडल्स भी पेश किये हैं. इन गाड़ियों के लिए जरूरी लिथियम की बैटरियों का उत्पादन करने वाली कंपनियों को अनुमति दी जा रही है. महाराष्ट्र में भी जल्द ही लिथियम बैटरियों का उत्पादन करने वाली 5 कंपनियां खुलेंगी. हम मानते हैं कि ये दीर्घकालिक उपाय हैं और फिलहाल पेट्रोल-डीजल की कीमतें घटाने के लिए प्रयास जारी हैं.

उन्होंने कहा कि जीएसटी पर अमल करते समय राज्य सरकारों ने इन्कम को ध्यान में रखकर पेट्रोल, डीजल व शराब को जीएसटी के दायरे से बाहर रखने की मांग की थी, लेकिन लगातार हो रही वृद्धि के बाद राज्य सरकारों ने भी केंद्र को ईंधन को जीएसटी के दायरे में लाने को सहमति दी है. एक प्रश्न के उत्तर में उन्होंने कहा कि हमारी सरकार संविधान में कोई बदलाव नहीं करेगी. उन्होंने कांग्रेस पर आरोप लगाया कि उसने संविधान में 72 बार बदलाव किए. उन्होंने कहा कि पेट्रोल-डीजल के संबंध में जल्द फैसला लिया जाएगा व घोषणा की जाएगी.

**पीएमआरडीए द्वारा किये जा रहे रिंगरोड के कामकाज पर सवालिया निशान**

गड़करी ने कहा कि मेरा फेजवाइज काम करने पर विश्वास नहीं है, क्योंकि मेरा तजुर्बा है कि फेजवाइज काम करने पर वह काम लटक जाता है. पालकमंत्री फेजवाइज काम करने का निर्णय लेते हैं तो उन्हें पहल करनी चाहिए, लेकिन 80 प्रतिशत जमीन अधिग्रहण हुए बिना कोई भी काम किया नहीं जाना चाहिए. इस राय के साथ उन्होंने पीएमआरडीए के जरिए किए जा रहे शहर के चारों तरफ के रिंगरोड के कामकाज पर सवालिया निशान लगा दिया.

नितिन गड़करी ने कहा कि केंद्र सरकार ने पिछले 4 वर्षों में कई जनकल्याणकारी योजनाओं पर अमल किया. जनधन, जीएसटी, सड़कों व बंदरगाहों का विकास, रोजगार निर्माण, हर गांव में बिजली व उजाला योजना सहित विभिन्न योजनाओं पर प्रकाश डाला. पत्रकारों द्वारा पुणे व उससे सटे सातारा रोड व चांदनी चौक के विकास तथा रिंगरोड के संबंध में पूछे गये सवालों पर अपनी भूमिका स्पष्ट की.

**पीएमआरडीए पूर्ण जमीन अधिग्रहण करेगी तो रोड का काम मैं कराऊंगा**

उन्होंने कहा कि पुणे के चारों तरफ बनने वाले लगभग 110 कि.मी. के रिंगरोड का काम यदि विभिन्न चरणों में हुआ तो वह लटक सकता है. मेरा अनुभव है कि फेजवाइज किया गया काम पेंडिंग रह जाता है. रिंगरोड के लिए पीएमआरडीए पूर्ण जमीन अधिग्रहण करेगी तो रोड का काम मैं कराऊंगा, लेकिन यदि पालकमंत्री ने चरणबद्ध ढंग से काम करने का निर्णय लिया है तो भी मैं उनकी सहायता करूंगा.

**सड़कों से जुड़े विभिन्न कार्य तेजी से पूर्ण किये जायेंगे**

नितिन गड़करी ने कहा कि सड़कों से जुड़े विभिन्न कार्य तेजी से पूर्ण किये जायेंगे. 128 कि.मी. लंबे पुणे-सातारा हाई-वे को सिक्स-लेन बनाने का कार्य लगभग पूरा हो चुका है. इससे अंतर्गत 12 कि.मी. रोड पर अंडरपास बनाने सहित अन्य छिटपुट कार्य जमीन अधिग्रहण व तकनीकी कारणों से पेंडिंग हैं.

ये कार्य 5 दिसंबर तक पूर्ण किये जायेंगे. पुणे से पंढरपुर पालकी रूट का कार्य 6 महीने पहले केंद्र सरकार के पास आया है. इस रूट के कार्य को गति दी जाएगी.